# पचनसंस्थेसाठी उपवास फायदेशीर!

आरोग्य वार्ता

**अधूनमधून उपवास** करणे, पचनसंस्थेसाठी फायदेशीर ठरते, असे आढळून आले आहे. ही प्रक्रिया पोटाला पचनक्रियेपासून विश्रांती देते. उपवासाच्या वेळी, जेव्हा रक्तातील ग्लुकोजची पातळी जास्त प्रमाणात वापरली जाते आणि साठवलेल्या चरबीमध्ये जाते, तेव्हा शरीर त्याचा वापर ऊर्जेचा स्रोत म्हणून करते, असे आहारतज्ज्ञ सांगतात. तथापि, उपवासाने शरीरातील चरबी जाळण्यास आणि वजन कमी करण्यास मदत होते.

जास्त काळ उपवास केल्याने काही तोटेदेखील होऊ शकतात. संपूर्ण रासायनिक प्रक्रियेचे स्वतःचे परिणाम असतात जसे की हार्मोनल बदल, चरबीचे ऑक्सिडेशन आणि आतड्यांतील मायक्रोबायोटा बदल. उपवासाचे अंतिम ध्येय म्हणजे वजन कमी करणे आणि काही सुधारित संज्ञानात्मक कार्य साध्य करणे. तथापि, या प्रकारच्या आहाराचे काही नकारात्मक परिणाम होतात, जसे की डोकेदुखी, विशेषतः गॅस किंवा डोकेदुखीसह पोटफुगी म्हणून वर्गीकृत केलेले, जे काही व्यक्तींमध्ये होऊ शकते, असे आहारतज्ज्ञ म्हणतात.

खाण्याच्या पद्धतींमध्ये बदल झाल्यामुळे व्यक्ती जेवणाच्या काळात खूप जास्त आहार घेऊ शकते किंवा विविध प्रकारचे जेवण घेऊ शकते. या अचानक बदलामुळे गॅस्ट्रोइंटेस्टाइनल ट्रॅक्टवर जास्त भार पडू शकतो आणि यामुळे पोट फुगणे आणि अस्वस्थ वाटू शकते. उपवासाच्या काळात निर्जलीकरण हे आणखी एक कारण असू शकते, कारण काही लोक पुरेसे द्रवपदार्थ पीत नसतील, तर डोकेदुखी होऊ शकते, याकडे तज्ज्ञ लक्ष वेधतात.


कार लोन
किफायतशीर व्याजदर
8.35%*
*अटी लागू (ROI p.a.)
मुदत : ७ वर्षापर्यंत
कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!
Toll Free No.: 1800 233 0234





# सर्वांगीण औद्योगिक धोरण लवकरच; वीजदरांतही दिलासा

*(पान १ वरून)* येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये आयोजित या चर्चासत्रात 'आरपीजी समूहा'चे उपाध्यक्ष अनंत गोएंका, 'स्टरलाइट पॉवर'चे व्यवस्थापकीय संचालक प्रतीक अग्रवाल, 'सत्यगिरी समूहा'चे अध्यक्ष आणि फिक्की महाराष्ट्राचे सहअध्यक्ष दिनेश जोशी, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक बी. राधाकृष्णन हे सहभागी झाले होते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू यांनी राज्याच्या औद्योगिक विकास व धोरणाबाबत भूमिका मांडत चर्चासत्राचा समारोप केला.

'राज्यात उद्योगांसाठी जमिनी उपलब्ध होण्यात मोठी अडचण आहे. दरही प्रचंड असल्याने उद्योगांच्या खर्चात वाढ होते. त्यामुळे आता बहुमजली किंवा बहुस्तरीय उद्योगरचनेकडे वळणे अपरिहार्य झाले आहे. पण त्यामुळे कचरा, प्लास्टिक घनकचरा, सांडपाणी आदी कोणत्याही प्रकारे प्रदूषण वाढणार नाही आणि हवेचे प्रदूषणही होणार नाही, याची काळजी या नवीन धोरणामध्ये घेतली जाईल,' असे विकास आयुक्त कुशवाह यांनी सांगितले.

उद्योगांसाठी विजेची उपलब्धता आणि दर महत्त्वाचे घटक असून आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकण्यासाठी ते अत्यावश्यक आहे. मात्र, राज्यात विजेचा दर सर्वाधिक असून ते प्रति युनिट साडेसहा रुपयांपर्यंत कमी व्हावेत, अशी मागणी गोएंका यांनी चर्चासत्रात केली. ही वीज हरित स्रोतांद्वारे उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. त्यावर बोलताना राधाकृष्णन यांनी वाढत्या वीजनिर्मितीमुळे वीजदरांत कपात होईल, असा विश्वास व्यक्त केला. 'महानिर्मिती कंपनीकडून १३ हजार मेगावॉट वीजनिर्मिती करण्यात येत असून येत्या दहा वर्षांत ही क्षमता दुप्पट करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी बहुतांश वीज अपारंपरिक क्षेत्रातून येईल. यातून आगामी पाच वर्षांत वीजदर कमी होतील,' असे राधाकृष्णन यांनी स्पष्ट केले.

'स्टरलाइट पॉवर'चे अग्रवाल यांनी देशात किमान पाच आदर्श, सुंदर आणि प्रदूषणविरहित शहरे विकसित करण्यात यावीत, असे मत व्यक्त केले. मुंबईत गेल्या पाच वर्षांमध्ये हिवाळ्यात हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर होती. त्यात बांधकाम व कोळशाच्या ज्वलनातून निर्माण होणारे धूलिकण व कचरा आदींचा समावेश होता. कोणत्याही उद्योगपतीला त्याच्या कुटुंबासाठी चांगल्या सेवासुविधा असलेले स्वच्छ, प्रदूषणविरहित शहर उपलब्ध असेल, तर तो तेथे येतो आणि उद्योगांमध्ये गुंतवणूक करतो. त्या दृष्टीने शासनकर्त्यांनी विचार करावा, अशी अपेक्षा अग्रवाल यांनी व्यक्त केली. दुबईत २० करमुक्त व्यापार क्षेत्रे असून महाराष्ट्रात मात्र एकही नाही, असा उल्लेख करून राज्यातही त्या धर्तीवर अशी क्षेत्रे असावीत, असे मत 'फिक्की'चे जोशी यांनी मांडले. महाराष्ट्रात तीर्थक्षेत्रे व अनेक पुरातन मंदिरे असल्याने धार्मिक पर्यटनाला मोठा वाव असल्याचे त्यांनी नमूद केले. 'फायनान्शियल एक्स्प्रेस'चे वित्तीय संपादक महेश नायक यांनी चर्चासत्राचे तर कुणाल रेगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. 'इंडियन एक्स्प्रेस' वृत्तसमूहाचे कार्यकारी संचालक अनंत गोएंका यांनी परिसंवादात सहभागी झालेल्या वक्त्यांचे स्वागत केले.

## न्यू इंडिया बँक सारस्वत बँकेच्या छत्राखाली

**(पान १ वरून)** काढण्यावर प्रतिबंध आले. ठेवींवरील विमा हमी म्हणून पाच लाख रुपयांपर्यंतची रक्कम काढण्याची मुभा ठेवीदारांना देण्यात आली आहे. अशा कालखंडात एनआयसीबीचा ताबा सारस्वत बँकेसारख्या मोठ्या, प्रतिष्ठित आणि सुरक्षित बँकेकडे जाणे हा संकटग्रस्त ठेवीदारांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. १०६ वर्षे जुन्या सारस्वत बँकेकडे ९३ हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. आजवर नऊ बँकांचे यशस्वी अधिग्रहण सारस्वत बँकेने केले आहे.

# कोयत्याच्या धाकाने लूटमार

## दौंड तालुक्यातील घटना, युवतीवर अत्याचाराचा प्रयत्न

**लोकसत्ता प्रतिनिधी**

> घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन दौंड पोलिसांना तातडीने तपास सुरु करण्याचा आदेश दिले आहेत. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले. चोरट्यांना पकडण्यासाठी दौंड, भिगवण, तसेच स्थानिक पोलिसांनी पथके तयार केली आहेत.
> –संदीपसिंग गिल, पोलीस अधीक्षक .

**पुणे :** देवदर्शनासाठी निघालेल्या कुटुंबाला धमकावून चोरट्यांनी लूटमार केल्याची घटना रविवारी पुणे- सोलापूर महामार्गावरील दौंड तालुक्यात घडली. चोरट्यांनी लूटमार केल्यानंतर युवतीला धमकावून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती दौंड पोलिसांनी दिली. ही घटना उघडकीस आल्यानंतर दौंड, भिगवण पोलिसांची पथके आरोपींना पकडण्यासाठी रवाना झाली आहेत.

पुण्याहून एक कुटुंब मोटारीतून रविवारी सोलापूरकडे निघाले होते. देवदर्शनासाठी निघालेले कुटुंब पुणे- सोलापूर महामार्गावरील स्वामी चिंचोली गावाजवळ असलेल्या एका उपाहारगृहाजवळ सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास थांबले. मोटार उपाहारगृहासमोर लावून त्यांनी चहा प्यायला. त्या वेळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी कुटुंबाला कोयत्याचा धाक दाखविला. कुटुंबातील सात जणांमध्ये महिला होत्या. महिलांना धमकावून त्यांच्याकडील दागिने हिसकावून घेतले. त्या वेळी मोटारीत अल्पवयीन युवती होती. एका चोरट्याने तिला कोयत्याचा धाक दाखवून उपाहारगृहाच्या परिसरात असलेल्या झाडीत नेऊन अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. युवतीने आरडाओरडा केला. त्यानंतर चोरटे दुचाकीवरून पसार झाले. या घटनेनंतर घाबरलेले कुटुंब मोटारीतून दौंड परिसरात आले. त्यांनी दौंड पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

पोलिसांनी या भागातील सराईतांची चौकशी सुरू केली आहे, अशी माहिती दौंडचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांनी दिली.

## खड्ड्यात बुडून तिघांचा मृत्यू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** पंचवटीत बांधकामासाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाण्यात बुडून तीन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला. विडी कामगार नगर भागात ही दुर्घटना घडली. साई गरड (१४), साई जाधव (१४) आणि साई उगले (१३) अशी मुलांची नावे आहेत.

पंचवटी परिसरात कालव्यालगतच्या रस्त्याजवळ नव्या इमारतीचे काम सुरू आहे. पायासाठी खोदलेल्या विस्तीर्ण खड्ड्यात पावसाचे पाणी साचले आहे. रविवारी ही मुले पाण्यात खेळण्यासाठी वा आंघोळीसाठी गेल्याचा अंदाज वर्तविला जातो. मुले घरी न परतल्याने कुटुंबीयांनी आडगाव पोलिसांत तक्रार दिली आली. पोलिसांनी परिसरात मुलांचा शोध घेतला. सोमवारी सकाळी बांधकाम प्रकल्पाच्या खड्ड्याजवळ मुलांचे कपडे आणि चपला आढळल्या. अग्निशमन दलाने शोध मोहीम राबविल्यावर तिघांचे मृतदेह हाती लागले. याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक आणि ठेकेदाराविरुद्ध सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

## विजेच्या धक्क्याने वारकऱ्यांचा मृत्यू

**सातारा :** संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील दोन वारकऱ्यांचा विजेचा धक्का बसून मृत्यू झाला. ही घटना रविवारी रात्री फलटण तालुक्यात घडली.

तुषार बावनकुळे (२२) आणि मधुकरराव शेंडे (५५) अशी मृतांची नावे असून ते नागपूरमधील रहिवासी होते. कपडे वाळत घालण्यासाठी विजेच्या खांबाला दोरी बांधत असताना वारकऱ्यांना विजेचा धक्का बसला. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.


लोकसत्ता बाकीबाब!




काव्याच्या क्षितिजावरला तारा...

'मनोहर' मासिकाचा मे १९४९ सालातील आता दुर्मीळ झालेला बोरकरांवरील विशेषांक. तेव्हाचे साहित्यपटल गाजविणाऱ्या वि.स. खांडेकर यांनी या अंकासाठी 'काव्यवाटिकेतला कलमी आंबा' या शीर्षकाने केलेला बोरकरांचा खास परिचय. खांडेकर आणि बोरकरांचा स्नेह स्पष्ट करणारा...

वाचा 'बाकीबाब' अंकात...


## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनाही 'ग्रॅच्युईटी' लागू

**नागपूर :** 'पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट, १९७२' हा कायदा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनाही लागू होतो. मात्र, या कायद्यातील कलम ४(६) नुसार जर कर्मचाऱ्याविरोधात नैतिक अधःपतनाशी संबंधित गुन्हा असेल, तर त्याला मिळणारी ग्रॅच्युईटी रक्कम थांबवता येते, असे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले.


**शासकीय तंत्रनिकेतन मुंबई**
(महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था)
४९, अली यावर जंग मार्ग, खेरवाडी, वांद्रे (पू.), मुंबई-४०००५१
**जाहीर लिलाव**

संस्थेतील जुने, मोडकळीस आलेले आणि निर्लेखित झालेले फर्निचर व इतर साहित्यांचा 'आहे त्या स्थितीमध्ये' विक्री करणे असून त्याकरिता परवानाधारक ठेकेदारांकडून सीलबंद लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदरचे निविदा अर्ज, अटी व शर्ती संस्थेच्या 'www.gpmumbai.ac.in' या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक खरेदीदारांनी फर्निचर व इतर साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करून वेळेत निविदा सादर करावी.

सही/-
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन मुंबई

डीजीआयपीआर-२०२५-२६/१४३४



**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
बांधकाम विभाग – प्र.स.क्र. ०३
**प्रथम ई निविदा सुचना क्रमांक ३६ / २०२५–२६**

भिवंडी निजामपूर शहर महानगपालिकेच्या बांधकाम विभाग मार्फत "साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना" या शासन निधी अंतर्गत खालिल नमुद कामांचे ई निविदा फॉर्म **htt{s://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर विक्रीस उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी भि.नि.श. म.न.पा. नविन शासकीय इमारतीमधील ५ मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

**निविदा विक्री दि. ०१/०७/२०२५ ते दि. १५/०७/२०२५ सादरीकरण दि. १५/०७/२०२५**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (इतर चार्जेस वगळून) | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्रं. २१ मध्ये राहुल नगर भारत कॉलनी येथे मोरेवार घर, दत्ता फुलवाले घर, हिरा भोईर इ. परिसरात गटर व पायवाट तयार करणे. | रु. १४,१९,२६२/- | ५००/- +९०/- |

सही/–
(जमील पटेल)
शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका



भारत सरकार, संरक्षण मंत्रालय
संरक्षण संपदा अधिकारी यांचे कार्यालय, मुंबई परिमंडळ, मुंबई – ४००००५.
टेलिफोन: ०२२-२२१५३२३२ (टेलिफॅक्स)
Government of India,
Ministry of Defence
O/o. Defence Estates Officer Mumbai Circle, Colaba. Mumbai- 400005
Telephone No. 022-22153232 (Telefax)

**फाइल क्रमांक जन./नवीन/६४/प्रोजेक्ट/XI/३२** **दिनांक: २०.०६.२०२५**

**ई-लिलाव सूचना**

संरक्षण संपदा अधिकारी, मुंबई परिमंडळ हे प्रकल्पाअंतर्गत ३४ उभ्या झाडांची विल्हेवाट लावण्यासाठी: आयएनएस हमला मार्वे मालाड (पश्चिम), मुंबई येथील उच्च सुरक्षा परिमिती भिंतीचे पाडाव आणि पुनर्बांधणी यासाठी इच्छुक बोलीदारांना दि. २१.०७.२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. ते दुपारी १३.०० वा. दरम्यान शासकीय ई-लिलाव प्रणालीची वेबसाइट www.eauction.gov.in यावर ई-लिलावात उपस्थित राहण्याचे आमंत्रण देत आहेत. कागदपत्रे सादर करण्याची/ देयके देणे सुरू होण्याची तारीख ०३.०७.२०२५ आहे आणि कागदपत्रे सादर करण्याची/ देयके देणे समाप्तीची तारीख ०९.०७.२०२५ आहे. झाडे दि. ०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता दाखवली जातील. आवश्यक अटी आणि शर्ती, आवश्यक कागदपत्रांची यादी, ई-लिलाव अर्ज इत्यादी, शासकीय ई-लिलाव प्रणालीची वेबसाइट www.eauction.gov.in च्या ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केले जातील किंवा कार्यालयीन वेळेत संरक्षण संपदा कार्यालय, मुंबई परिमंडळ, कुलाबा, मुंबई येथे पाहता/ मिळवता येतील.

सही/–
(हर्षा एच. ई., आयडीईएस)
संरक्षण संपदा अधिकारी
मुंबई परिमंडळ



**नवी मुंबई महानगरपालिका**
वि.भा.ना./ति.ता.जा.क्र.04/2025
(विष्णुदास भावे नाट्यगृहाच्या तिमाही तारखा वाटपाबाबत)

नवी मुंबई मधील विष्णुदास भावे नाट्यगृहाच्या माहे ऑक्टोबर 2025 ते डिसेंबर 2025 या कालावधीत नाट्यगृहात नाट्यप्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम, संगीताचे कार्यक्रम, इतर करमणुकीचे कार्यक्रम, परिषद, सभा व संमेलने आयोजित करण्यासाठी नाट्यनिर्माते, विविध शैक्षणिक संस्था, कंपन्या व व्यक्ती यांच्याकडून तारखा वाटपासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यास अनुसरुन दि.01/07/2025 ते दि.10/07/2025 पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत.

विष्णुदास भावे नाट्यगृहाचे भाडे थकलेल्या संस्थांनी थकबाकीची रक्कम भरल्याशिवाय त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. नाट्यसंस्थांनी त्यांच्या चालु असलेल्या नाट्य प्रयोगांची नावे अर्जामध्ये नमूद करावीत. शैक्षणिक व सामाजिक (नोंदणीकृत) संस्थांनी आपले अर्ज लेटरहेडवर संस्थेच्या पदाधिका-यांच्या सही शिक्क्यानिशी करावेत.

कोणताही अर्ज स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार उप आयुक्त तथा व्यवस्थापक, विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी यांनी राखून ठेवला आहे. अर्ज केला म्हणजे तारीख मिळेलच असे नाही याची नोंद घ्यावी. नाट्यगृहाचे नियम, अटी व भाडयाचे दर इत्यादीबाबत उप आयुक्त तथा व्यवस्थापक, विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी बस डेपोसमोर, सेक्टर 16 ए, वाशी, नवी मुंबई-400 703 येथील कार्यालयात समक्ष अथवा दुरध्वनी क्रमांक 022-27667879 यावर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

सही/-
(अभिलाषा म्हात्रे)
उप आयुक्त तथा व्यवस्थापक
विष्णुदास भावे नाट्यगृह
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/238/2025



**GOVERNMENT OF INDIA**
**MINISTRY OF DEFENCE**
**EX-SERVICEMEN CONTRIBUTORY HEALTH SCHEME**
**STATION HQ (ECHS CELL) AHILYANAGAR**
**(PHONE : 0241-2321233)**
**Email : shqahmednagar@echs.gov.in**
**EMPLOYMENT NOTICE**

1. ECHS invites applications to engage following posts for Officers, Para Medical & Non Para Medical Staff on contractual basis in **04 x** ECHS Polyclinics Ahmednagar, Osmanabad, Latur & Beed for a period of one year **renewable for additional period of one year/till attaining the maximum age subject to performance of candidates/other conditions** according to the criteria as mentioned against each post:-

| Appointment | Minimum Qualification | No of Vac | Fixed Remuneration |
|---|---|---|---|
| Officer-In-Charge | Graduate (Only ESM Offr) | 01 Osmanabad | 75,000/- |
| Medical Specialist | MD/MS in Specialist concerned/DNB | 02 Ahmednagar | 1,00,000/- |
| Medical Officer | MBBS | 06 (03 Ahmednagar, 01 Osmanabad, 01 Latur @, 01 Beed @) | 75,000/- |
| Dental Officer | BDS | 02 (01 Osmanabad @, 01 Beed) | 75,000/- |
| Lab Tech | (i) B.Sc. (Medical Lab Tech) OR (i) 10/12 with science from recognized board & Diploma in Medical Lab Tech | 02 (01 Ahmednagar, 01 Latur) | 28100/- |
| Lab. Asst | DMLT/Class 1 Lab Tech Course (Armd Forces) | 02 (01 Ahmednagar, 01 Latur) | 28100/- |
| Pharmacist | (i) B Pharmacy OR (i) 10+2 with science stream (ii) D Pharmacy | 02 (01 Ahmednagar, 01 Latur) | 28100/- |
| Nursing Asst | GNM Diploma/Class 1 Course (Armd Forces) | 01 Osmanabad | 28100/- |
| Dental Hyg/Asst | Diploma-Dental Hyg/Class 1 DH/DORA Course (Armd Forces) | 03 (01 Ahmednagar, 01 Osmanabad, 01 Beed) | 28,100/- |
| Data Entry Operator/Clerk | Graudate/Class 1 Clerical Trade (Armd Forces) | 01 Latur | 22,500/- |
| Female Attendant | Literate | 04 (01 Ahmednagar, 01 Osmanabad, 01 Latur, 01 Beed) | 16,800/- |
| Safaiwala | Literate | 03 (01 Osmanabad, 01 Latur, 01 Beed) | 16,800/- |

**@- 01 x Medical Officer at Latur, 01 x Medical Officer at Beed, 01 x Dental Officer at Osmanabad to be considered for extension if no ESM applies**

2. **For terms and conditions, Application Form & Remuneration.** Kindly see our website www.echs.gov.in. For additional details, please contact Stn HQ (ECHS Cell) Ahilyanagar at Telephone No 0241-2321233. Mobile No. 8000817122 & email ID **shqahmednagar@echs.gov.in**. Also approach concerned ECHS Polyclinic for details. Preference will be given to the Ex-servicemen.
3. **On the Job Training (OJT) -** Selected individuals for the post of OIC, Medical Specialist, Medical Officer, Dental Officer will carry out 10 days OJT and the period will remain unpaid.
4. **Last date of receipt of application as per format given at our website**. Application as per requisite format alongwith self attested photocopies of testimonials in support of Educational Qualifications and Work Experiences will be submitted to OIC, Stn HQs (ECHS Cell) Ahilyanagar by **28 Jul 2025** in duplicate by post. Any application received after **28 Jul 2025** will not to be accepted.
5. **Interview Date, Timing & Venue**. Eligible applicants will be intimated date and time separately for interview at Station HQ Ahilyanagar, Jamkhed Road which is planned in month of **Sep 2025.** Candidates must bring all the original certificates/mark sheets/degree of 10th /Matric, 10+2 & Graduation / post graduation / diploma/ course, work experience and discharge book, PPO, service records and 02 PP size colour photographs at the time of interview. No TA/DA is admissible. Only candidates meeting the Qualitative Requirements may apply.



**नॅशनल टेक्सटाइल कॉर्पोरेशन लिमिटेड, (डब्ल्यूआरओ), मुंबई**
एनटीसी NTC
एनटीसी हाऊस, १५ एन. एम. मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१
**दूरध्वनी क्रमांक:** +९१ २२ २२६८६६०० **फॅक्स:** +९१ २२ २२६८६६३१, **वेबसाइट:** www.ntcltd.org

**हस्तांतरणयोग्य विकास हक्क (टीडीआर) विक्रीसाठी निविदा सूचना**

एनटीसीने '**टीडीआर विक्री**' साठी प्रतिष्ठित बोलीदारांकडून दोन बोली प्रणाली अंतर्गत एमएसटीसी संदर्भ क्रमांक एमएसटीसी/डब्ल्यूआरओ/नॅशनल टेक्सटाइल कॉर्पोरेशन लिमिटेड/२/बॅलार्ड इस्टेट,/२५–२६/१७६१५ द्वारे ई–निविदा आणि ई–लिलाव आमंत्रित केले आहे.
इच्छुक बोलीदारांनी तपशीलवार निविदा दस्तऐवजासाठी कृपया वेबसाइटला भेट द्यावी – **https://www.mstcecommerce.com** किंवा **www.ntcltd.org** आणि **https://eprocure.gov.in.**
तांत्रिक आणि आर्थिक बोली सादर करण्यासाठी ऑनलाइन ई–निविदा बंद होण्याची तारीख १७/०७/२०२५ आहे.
महाव्यवस्थापक (एएम)



**डेल्टा कॉर्प लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय**:-डेल्टा हाऊस, प्लॉट क्रमांक १२, हार्नबाय वेलार्ड इस्टेट, डॉ. ॲनी बेझंट रोड, कॉपर चिमनी शेजारी, वरळी, मुंबई - ४०००१८
**सी.आय.एन. क्र.**: L65493MH1990PLC436790 **दूरध्वनी क्र.**: 91-22-69874700
**ईमेल आयडी**: secretarial@deltin.com **वेबसाईट** : www.deltacorp.in

**समभागधारकांना सूचना**
**गुंतवणूकदार शिक्षण आणि सुरक्षा निधी प्राधिकरण (आयईपीएफ) मध्ये समभागांचे हस्तांतरण**

वेळोवेळी सुधारीत करण्यात आलेल्या आयईपीएफ (लेखा, लेखापरिक्षण, स्थलांतरण आणि परतावा) नियम, २०१६ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनीज कायदा, २०१३ च्या कलम १२४ च्या मान्यतेच्या अनुषंगाने कंपनीचे समभाग ज्यांच्या लाभांशाचा दावा किंवा प्रदान मागील सात सलग वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात आलेले नाही, त्यांच्यासंदर्भात समभागांचे हस्तांतरण आयईपीएफ प्राधिकरण यांच्याकडे करणे गरजेचे आहे. डेल्टा कॉर्प लिमिटेडच्या बाबतीत ते समभाग ज्यांचा लाभांशाचा दावा किंवा प्रदान मागील सात सलग वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात आलेला नाही, त्यांचा हस्तांतरणाची तारीख **रविवार, ५ ऑक्टोबर, २०२५** ही आहे. नमूद नियमांच्या अनुषंगाने कंपनी अशा समभागधारकांना ज्यांच्या समभागांचे हस्तांतरण आयईपीएफकडे करणे गरजेचे आहे, त्यांच्याशी वैयक्तिक पत्रव्यवहार करीत आहे. कंपनीने अशा समभागधारकांचे तपशील संकेतस्थळावर म्हणजे www.deltacorp.in वर अपलोड केले आहे.
समभागधारकांना याद्वारे अशीही सूचना देण्यात येत आहे की, २०१७-१८ आर्थिक वर्षाच्या लाभांशासंदर्भात दावा / लाभांशाचे प्रदान न झालेले / दावा न करण्यात आलेल्या लाभांशाचा दावा **शनिवार, ४ ऑक्टोबर, २०२५** पर्यंत करण्यात आल्यास समभागांचे हस्तांतरण आयईपीएफ प्राधिकरणाकडे करण्यात येणार नाही. कृपया नोंद घेण्यात यावी की, नियत दिनांकापर्यंत लाभांशाचा दावा करण्यात आला नाही / प्रदान करण्यात आले नाही तर अशा समभागधारकांच्या समभागांचे हस्तांतरण आयईपीएफ प्राधिकरणाकडे करण्याची प्रक्रिया कंपनी सुरू करेल.
आयईपीएफला लाभांशाचे आणि समभागांचे हस्तांतरण झाल्यानंतर, समभागधारक नियमांनुसार IEPF-5 फॉर्मद्वारे आयईपीएफ प्राधिकरणास निवेदन करून त्यांचा दावा करू शकतात. वरील फॉर्म कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.mca.gov.in वर उपलब्ध आहे.
उपरोक्त संदर्भात कोणत्याही चौकशीसाठी समभागधारक कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजन्ट यांच्याशी खाली नमूद करण्यात आल्याप्रमाणे संपर्क करू शकतात.
पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,
युनिट क्र. ९, तळमजला, शिव शक्ती इंडस्ट्रियल इस्टेट, जे. आर. बोरिचा मार्ग, लोअर परेल (पू), मुंबई - ४०० ००१.
ईमेल आयडी: support@purvashare.com

**स्थळ** : मुंबई
**दिनांक**: १ जुलै २०२५

**डेल्टा कॉर्प लिमिटेड करिता**
**सही / -**
**दिलीप वैद्य**
**कंपनी सचिव - उपाध्यक्ष, सचिवीय**
**एफसीएस क्र. ७७५०**



**रेप्को होम फायनान्स लिमिटेड**
Repco Home Finance
**डोंबिवली शाखा**: गावदेवी मंदिराजवळ, पहिला मजला, जयकूल आर्केड, डोंबिवली (पूर्व)–४२१२०१, महाराष्ट्र. फोन: (०२५१) २४२६७८७, ९३७२६१८६८३

**ई-लिलाव विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ अंतर्गत ''रेप्को होम फायनान्स लिमिटेड''कडे गहाण असलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री**

ज्याअर्थी खालील ऋणको व सह–ऋणकोंनी **''रेप्को होम फायनान्स लिमिटेड'', डोंबिवली शाखे**कडून कर्ज घेतले आहे आणि दायित्वांचा तपशील याखाली दिल्यानुसार आहे, ज्याअर्थी, कंपनीने सरफेसी अ‍ॅक्टअंतर्गत सूचना निर्गमित केली आहे आणि प्राधिकृत अधिकारींनी गहाणवट मालमत्तेचा ताबा घेतला आहे आणि याखाली नमूद केलेल्या तारखांदिवशी सूचना निर्गमित केल्या आहेत आणि कंपनीने आता **''जसे आहे जेथे आहे''** व **''जसे आहे जे काही आहे''** या तत्त्वावर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या सेक्शन ८ व ९ अंतर्गत मालमत्तेची विक्री करण्याचे ठरविले आहे.

**ई-लिलावाची तारीख व वेळ: १२.०८.२०२५,** स. ११.०० – दु. १२.००
(५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह)
ई–निविदा सादर करण्याकरिता शेवटची तारीख व वेळ: ११.०८.२०२५ रोजी दु. ०४.०० वा.

**अनु क्र. १ : ऋणको: श्री. शैलेंद्र चंद्रभान मौर्या**, श्री. चंद्रभान हरी शंकर मौर्या यांचे सुपुत्र, **सह–ऋणको: श्रीमती अनिता रामप्रसाद मौर्या**, श्री. शैलेंद्र सी. मौर्या यांची पत्नी, **हमीदार: श्री. संदिप कुमार जयस्वाल**, श्री. छेदीलाल जयस्वाल यांचे सुपुत्र, मागणी सूचना तारीख: १८.०२.२०१५; मागणी सूचनेनुसार दावा केलेली रक्कम (अका. नं. १५९१८७०००३२९८) असलेली रक्कम रु.१६,०४,२३८/– १२.०२.२०१५ रोजीप्रमाणे पुढील व्याज, किंमत व खर्चासह एकत्रित. ताबा घेतल्याची तारीख: १९.०५.२०२५, सद्य थकित रक्कम: रु.१६,६९,२६२/– १७.०६.२०२५ रोजीप्रमाणे.
**मालमत्तेचे वर्णन**: पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे– फ्लॅट नं. ३०६, तिसऱ्या मजल्यावरील, सुमारे मोजमापाचा ६२८ चौ.फू. म्हणजेच ५८.३६ चौ.मी. बिल्ट–अप एरिआ, बिल्डिंग नं. बी/२ मधील, ''साई देव पार्क'' म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील, जमीन धारण केलेला सर्व्हे नं. १६९/४ पार्ट च्या सर्व खंड व तुकड्यांवर बांधकाम केलेला, मोजमापाचा एरिआ ५५७.४ चौ.मी, येथे पडून असलेला, असलेला व स्थित असलेला– व्हिलेज पूर्णा, ता. भिवंडी, जि. ठाणे, ग्रामपंचायत पूर्णाच्या मर्यादेत, उप–जिल्हा भिवंडी, नोंदणी जिल्हा ठाणे, फ्लॅटची अनुसूची: पूर्व– डक्ट, पश्चिम– फ्लॅट नं. ३०५, उत्तर– पॅसेज, दक्षिण– ओपन स्पेस. जमिनीची अनुसूची: पूर्व– रोड, पश्चिम– वसंत भोईर यांची मालमत्ता, दक्षिण– वसंत भोईर यांची मालमत्ता व तलाव, उत्तर– चौधरी यांची मालमत्ता.

| राखीव किंमत: | रु.२७,१३,०००/– | इरठे: (राखीव किमतीच्या १०%) | रु.२,७१,३००/– | किमान बोली वृद्धी रक्कम: | रु.२५,०००/– |
|---|---|---|---|---|---|

**अनु क्र. २ : ऋणको: श्री. कृष्णा केशव जाधव**, श्री. केशव भैरू जाधव यांचे सुपुत्र, **सह–ऋणको: श्रीमती तेजश्री कृष्णा जाधव**, श्री. कृष्णा केशव जाधव यांची पत्नी, **हमीदार: श्रीमती सुनिता राजेश बनसोडे**, श्री. राजेश बनसोडे यांची पत्नी; मागणी सूचना तारीख: १८.०२.२०२५; मागणी सूचनेनुसार दावा केलेली रक्कम (अका. नं. १५९१८७००००७१३) असलेली रक्कम रु.७,२५,३७९/– १२.०२.२०२५ **रोजीप्रमाणे** पुढील व्याज, किंमत व खर्चासह एकत्रित. ताबा घेतल्याची तारीख: १९.०५.२०२५, सद्य थकित रक्कम: रु.७,६०,९३१/– **१७.०६.२०२५ रोजीप्रमाणे.**
**मालमत्तेचे वर्णन**: पुढील जमीन व इमारत मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे: येथे स्थित– फ्लॅट नं. २०७, दुसऱ्या मजल्यावरील, ए विंग, एरिआ मोजमापाचा ५४८ चौ.फू. बिल्ट–अप, ''कृष्णामाई पार्क'' म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील, जमीन धारण केलेला सर्व्हे नं. १० च्या प्लॉटवर स्थित असलेला, एरिआ मोजमापाचा ०–१३–० (एच–आर–पी) व पोट खराबा ०–०५–८ (एच–आर–पी), व्हिलेज नांदिवली टर्फे अंबरनाथ, ता. कल्याण, जि. ठाणे, नांदिवली टर्फे अंबरनाथ ग्रामपंचायतच्या मर्यादेत, नोंदणी जिल्हा ठाणे, उप–नोंदणी जिल्हा कल्याण–१ व जिल्हा ठाणे पुढीलप्रमाणे सीमित: पूर्वेला किंवा त्या दिशेने: ओपन स्पेस व रोड, पश्चिमेला किंवा त्या दिशेने: पॅसेज, उत्तरेला किंवा त्या दिशेने: फ्लॅट नं. २०६, दक्षिणेला किंवा त्या दिशेने: स्टेअरकेस.

| राखीव किंमत: | रु.१३,७०,०००/– | इरठे: (राखीव किमतीच्या १०%) | रु.१,३७,०००/– | किमान बोली वृद्धी रक्कम: | रु.२५,०००/– |
|---|---|---|---|---|---|

**ई–लिलाव प्रक्रियेकरिता, कृपया संपर्क साधावा: मेसर्स ४क्लोजर, एम. किरणमाई– मोबा.: ८१४२०००६६ व ८१४२००००६२.**
**स्वारस्य असलेले बोलीदार मालमत्तेच्या पाहाणीकरिता संपर्क साधू शकतील– ब्रँच हेड, ''रेप्को होम फायनान्स लिमिटेड'', डोंबिवली शाखा, कामकाजाच्या सर्व दिवशी स. १०.०० ते सायं. ०५.०० दरम्यान.**
**संपर्क क्र.: ०२५१–२४२६७८७ व ९३७२६–१८६८३.**

**दिनांक : २६.०६.२०२५** **प्राधिकृत अधिकारी, रेप्को होम फायनान्स लिमिटेड**